जा.क्रमांक/जिपग/खाप्राशा/प्रथममान्यता/ 565 /२०२१
कार्यालय शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली
दिनांक 5/5/2021

प्रति,

अध्यक्ष/सचिव
सी.एम.आय.सर्विस सोसायटी, तारसा
ता. गोडंपिपरी जि. चंद्रपूर

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून प्रथम खाते मान्यता प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचा शासन निर्णय क्र. NOC-२००९/(७१/०९) SE-१ दिनांक ०५/०५/२००९

२. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. नाहप २०१३/(७५/१३)माशि-१दिनांक ०२ ऑगष्ट २०१३

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २००९-१० या वर्षामध्ये प्रथम खाते मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता.प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस वरील संदर्भिय पत्रानुसार प्रथम खाते मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येते.

| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | मान्यता मिळालेले शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचे प्रकार नवीन शाळा दर्जा | शाळेचा प्रकार | मंडळ सलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गडचिरोली | सी.एम.आय.सर्विस सोसायटी, तारसा ता. गोडंपिपरी जि. चंद्रपूर | कारमेल ॲकॅडमी भंडारा रोड,वडसा जि. गडचिरोली | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक/उच्च प्राथमिक वर्ग १ ते ८ | सी.बी.एस.ई | सन २००९-१० |

अटी व शर्ती :-

१) सदर शाळेने बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ या अंतर्गत केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून असेल.

३) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.

४) परवसनगी देण्यात आपली नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा १ ) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतीरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

६) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करीता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविनारा फलक लावणे बंधनकारक राहील. वेळोवेळी करण्यात येणा-या पात्र व्यवहारावर स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/ वर्ग असे लिहिने बंधनकारक राहील.

७) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत प्रथम खाते मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना यु डायस मध्ये माहिती भरतांना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणुन नोंद करणे आवश्यक राहील.

९) परवानगी दिलेल्या स्वंयअर्थसहायीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाने सध्या अस्तीत्वाता असलेल्या प्रचलित नियम व शासन वेळोवळी विहीत करेल अशा नियमाचीं अंमलबजावनी करणे बंधनकारक राहील.

R.P. [signature]

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

9/03/2014

जिल्हा परिषद, गडचिरोली

प्रतिलीपी :-

१. मा.अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय मुंबई -३२ यांना माहीतीस सविनय सादर.

२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पूणे यांना माहीतीस सविनय सादर.

३. मा.शिक्षणउपसंचालक,नागपूर विभाग,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.

४. मुख्याध्यापक, कारमेल ॲकॅडमी भंडारा रोड,वडसा जि. गडचिरोली यांना माहीतीस्तव अग्रेषित.

सही

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

जिल्हा परिषद, गडचिरोली

Principal
Carmel Academy,Amgaon
Wadsa, Dt.Gadchiroli, M.S.,441207
... Af. 1130467, U.No.2712120310?

CARMEL ACADEMY
Amgaon-441207
Manager Principal

नमुना दोन

जावक क्रः जिपग/शिवि/प्राथ./RTE/शा. मा./464/2020
कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली
दिनांक : 04/02/2021

प्रति,
**अध्यक्ष/सचिव,**
**सी.एम.आय.सर्विस सोसायटी, तारसा ता. गोडंपिपरी जि. चंद्रपूर**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपला सन २०२०-२१ च्या प्रस्तावानुसार आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी या आधारे **मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली,** 31/03/2019 ते 01/04/2022 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 करीता कारमेल ॲकॅडमी **भंडारा रोड वडसा जि.गडचिरोली. (माध्यम - इग्रंजी )** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.
**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 ( जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 ( जोडपत्र दोन ) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25 % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणाकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांना भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7.**(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
**(तिन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
**(पाच)** विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
**(सहा)** अधिनिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाया शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
**(सात)** अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि
**(आठ)** शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा

- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह- [illegible]
स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. - **आहे.**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **आहे.**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर- **लागु नाही.**
- अध्यापन-अध्यापन साहित्य/ खेळ व क्रीडा विषयक सामुग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता - **होय.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध - **होय.**
- सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?- **होय.**
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय?- **आहे.**

11. मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळविण्याकरीता चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकायाकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **27121203104** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
19. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणाया उपरोक्त त्रुटींची पुर्तता दिनांक 31.04.2022 पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. ***अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.***

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

प्रतिलिपी :-
मुख्याध्यापक, कारमेल ॲकॅडमी भंडारा रोड वडसा जि.**गडचिरोली.** यांना माहितीस अग्रेषीत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,गडचिरोली**

**Principal**
Carmel Academy,Amgaon
Wadsa, Dt.Gadchiroli, M.S.,441207
CBSC Af. 1130467, U.No.27121203104

CARMEL ACADEMY
Amgaon-441 207
Manager Principal